ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

**38.**

# भारतातील महिलांवरील अत्याचार एक समस्या

**डॉ.सुरेश बी. ढाके.**
विभाग प्रमुख अर्थशास्त्र
कला वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लिकेशन,
महिला महाविद्यालय,डोंगर कठोरे
ता यावल जि जळगांव.

**राजरत्न भिमराव पोहेकर**
संशोधक विद्यार्थी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव

**प्रस्तावना :**

एकविसाव्या शतकाचा विचार केला असता भारत देशात विज्ञान आणि तंत्रज्ञानात वाढ होतांना दिसून येते. परंतु विज्ञानाचा विकास होतांनाच देशात इतर ही घटना मोठ्या प्रमाणात घडवून येत आहे. या घटनांमधील महत्वाची व संवेदनशील घटना म्हणजेच देशात महिलांवर होणारे अत्याचार होय. भारत देशाने संविधानिक मार्ग अवलंबिला आहे. व त्याच संविधानामार्फत अनुच्छेद १५ द्वारे निर्धारीत करण्यात आले की, भारतीय नागरिकत्व असलेल्या कोणत्याही व्यक्तीला धर्म, नस्ल, जाती, लिंग, जन्म या आधारे त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवू शकत नाही.

भारतीय संविधानाद्वारे प्रत्येक नागरिकाला समानता आणि अभिव्यक्ती स्वातंत्र बहाल करण्यात आले आहे. परंतु राज्यघटनेने दिलेली समानता काही कर्मठ आणि पुरूषप्रधान संस्कृती जपनारे लोक हिसकावण्याचा प्रयत्न करीत आहे. इथल्या मनुवादी आणि पुरूषप्रधान संस्कृतीने नेहमीच स्त्रियांना दुय्यम वागणूक दिली आहे. समाजातील काही लोकांची अशी मानसिकता झालेली आहे की स्त्री फक्त उपभोगाचे साधन आहे अशा विचारसरनीने स्त्रियांना शिक्षण, सत्ता, संपत्ती या सर्वच अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले. धार्मिक कायद्याचा आधार घेवून स्त्रायांवर अधिकाधिकच बंधने लादण्यात आली यामध्ये सतीप्रथा, बालविवाह, मासिक धर्माची अपृश्यता अशा अनेक अन्यायकारक चालीरिती व वर्तमानात होणारे शारिरीक व मानसिक अत्याचार यामुळे देशातील स्त्रियांचे अवघे आयुष्यच करपून टाकले आहे.

मागील काही कालखंडात स्त्रियांवर होणारे सतत अत्याचार ही खुप चिंतेचा विषय ठरत आहे. या अत्याचारामध्ये विनयभंग, छेडछाड, बलात्कार, खून, हुंडाबळी, कौटूंबीक हिंसा, वेठबिगारी, बळजबरी वेश्या व्यवसाय, जातीय–वर्गीय भेदभाव, अनादर, अपमान, शिवीगाळ अशा अनेक प्रकारच्या अन्याय/अत्याचारांना स्त्रियांना बळी पडावे लागते. शारिरीक अत्याचाराच्या तर दिवसेंदिवस घटना घडतच आहे. जगात सर्वात मोठी लोकशाही असलेल्या देशात अशा घटना घडत आहे ही शरमेची बाब आहे.

- **उद्दिष्टे :**

१. भारतीय महिलांवर झालेल्या अत्याचाराचा अभ्यास करणे.

२. भारतीय महिलांवर जवळील लोकांनी केलेल्या लैंगिक अत्याचाराचा अभ्यास करणे.

- **संशोधन पध्दती:**

प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये द्वितीय साधन सामग्रीचा अभ्यास करण्यात आला आहे. या द्वितीय साधन सामग्रीमध्ये शासनाचे अहवाल, जनगणना अहवाल, राष्ट्रीय पातळीवरील मासिके, विविध नियतकालिके, दैनिके, वृत्तपत्रे व इंटरनेट संकेतस्थळे इ. आधार घेण्यात आला आहे.

- **भारतात वेगवेगळ्या अत्याचाराला बळी पडलेल्या महिला:**

भारत देशात आज आपणास असे दिसून येते की स्त्री पुरूषाच्या तुलनेत कोणत्याही क्षेत्रात कमी नाही परंतु असे असले तरी स्त्रियांवर अत्याचाराच्या घटना सतत देशात कुठेना कुठे घडतच आहे. महिलांवर एक स्त्री म्हणून तुच्छतेच्या बुध्दीनेच बहुतांशी अत्याचार घडतांना दिसून येतात. काही लोकांची अशी मानसिकता आहे की स्त्री कमकुवत आहे ती

ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

पुरूषांवर अवलंबून असते या अहंकारी व विद्रुप, मानसिकतेतून स्त्रियांचे शोषण व त्यांना अत्याचाराला बळी पडावे लागते. या वेगवेगळ्या अत्याचाराला बळी पडलेल्या स्त्रियांची संख्या किती आहे हे खालील तक्त्यावरून दिसून येते.

**तक्ता क्र.१**

**भारतात वेगवेगळ्या अत्याचाराला बळी पडलेल्या महिला (२०१३ ते २०१५)**

| अ. क्र | अत्याचार | वर्ष | | | प्रतिदिन | तास |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१३ | २०१४ | २०१५ | | |
| १ | बलात्कार | ३३७०७ | ३६७३५ | ३४७७१ | ९५ | ४ |
| २ | बलात्काराचे प्रयत्न करणे | — | ४२३४ | ४४४२ | १२ | |
| ३ | महिला व मुलींचे अपहरण करणे | ५१८८१ | ५७३११ | ४१५५६ | ११४ | ५ |
| ४ | हुंडा बळी | ८०८३ | ८४५५ | ७६४६ | २१ | १ |
| ५ | विनयभंग करणे | ७०७३९ | ८२२३६ | ८२८०० | २२७ | ९ |
| ६ | अपमान करणे | १२५८९ | ९७३५ | ८७०७ | ३११ | १३ |
| ७ | नातेवाईक आणि पतीद्वारे केलेले अत्याचार | ११८८६६ | १२२८७७ | ११३५४८ | ३११ | १३ |
| ८ | परदेशातुन आयात केलेल्या मुली | ३१ | १३ | ६ | ० | — |
| ९ | आत्महत्यासाठी उत्तेजन देणे | — | ३७३४ | ४०८५ | ११ | — |
| १० | महिलांवरील एकुण अत्याचार | २९५८९६ | ३२५३२९ | २९७५६१ | ८१५ | ३४ |

source: Indian crime report 2016

वरिल तक्त्या वरून महिला अत्याचाराचा विचार करता २०१३ ते २०१५ या कालावधीत अत्याचारात वाढ झालेली दिसून येते. भारतात दर तासाला ३४ महिला याप्रमाणे व प्रत्येक दिवसाला ८१५ महिला अत्याचाराला बळी पडतांना दिसून येते. अत्याचाराच्या बाबतीत विचार करता जवळच्या नातेवाईकांकडूनच होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण जास्त आहे. हुंडा बळीच्या संख्येत २०१३ च्या तुलनेत २०१५ मध्ये घट झाल्याचे दिसून येते. तर बलात्कार पिडीत महिलांच्या संख्येमध्य वाढ झालेली आहे. एकंदरीत पणे महिला अत्याचाराचा अभ्यास करता त्यामध्ये वाढ झालेली दिसून येते.

- **राज्यनिहाय महिलांवरील सरासरी अत्याचाराचे प्रमाण :**

देश विकासाच्या प्रवाहात आहे आणि देशाचा विकास हा देशातील नैसर्गिक साधन संपत्ती, खनिज संपत्ती व त्या–त्या देशातील मनुष्यबळावर अवलंबून असतो. त्या मनुष्यबळामध्ये स्त्री असो वा पुरूष दोघांचाही तितकाच सहभाग असतो. भारतात सुध्दा देशाच्या प्रगतीसाठी स्त्रियांचे खुप मोठ्या प्रमाणात योगदान आहे. परंतु स्त्रियांचे एवढे योगदान असतांनाही इथल्या स्त्रियांवर आजही काही पुरूषप्रधान मानसिकता असलेली मंडळी त्यांच्यावर सातत्याने अत्याचार करतांना दिसून येतात. ही अत्याचाराची सतत आकडेवारी वाढच आहे. महिलांवरील अत्याचाराची राज्यनिहाय आकडेवारी किती आहे ती खालील तक्त्यावरून बघू.

**राज्यनिहाय महिलांवरील अत्याचाराचे सरासरी प्रमाण**

तक्ता क्र २.

| अ. क्र | राज्य | तक्रारी( Cases) | पीडित महिला (दर लक्ष) | भारतातील सर्व वयोगटातील पीडित महिला (%) |
|---|---|---|---|---|
| १ | दिल्ली | १७१०४ | १८.४३ | ५.२ |
| २ | आसाम | २३२५८ | १४.८२ | ६.७१ |
| ३ | तेलंगाना | १५१३५ | ८३.१ | ४.६ |
| ४ | ओडीशा | १७१४४ | ८१.५ | ५.२ |
| ५ | राजस्थान | २८१६५ | ८१.५ | ८.६ |
| ६ | हरीयाणा | ९४४६ | ७५.७ | २.९ |
| ७ | पश्चिम बंगाल | ३३२१८ | ७३.४ | १०.१ |
| ८ | त्रिपुरा | १२६७ | ६८.२ | ०.४ |
| ९ | मध्यप्रदेश | २४१३५ | ६५.५ | ७.४ |
| १० | चंदीगड | ४६३ | ६४.८ | ०.१ |

स्त्रोत: राष्ट्रीय क्राईम रिपोट २०१७

वरिल आकडेवारीवरून महिला अत्याचाराचे राज्यनिहाय अत्याचाराचे सरासरीचे प्रमाण बघितले असता असे दिसून येते की, पश्चिम बंगाल या राज्यात सर्वात जास्त महिला अत्याचार झालेले आहे. म्हणजे १४०.१ टक्के एवढे होय. त्यानंतर अनुक्रमे राजस्थान ८.६ टक्के, मध्यप्रदेश ७.४ टक्के, आसाम ७.१ टक्के, दिल्ली ५.२ टक्के, ओडिशा ५.२ टक्के, तेलंगना ४.६ टक्के, हरियाणा २.९ टक्के व त्रिपुरा ०.४ टक्के एवढ्या प्रमाणात महिला अत्याचाराला बळी पडलेल्या आहेत. म्हणजेच देशात कोण्त्याही राज्यात महिला सुरक्षित नाही हे वरिल तक्त्यावरून दिसून येते.

- **भारतात जवळील लोकांकडून होणारे लैंगिक अत्याचार:**

मानवी जीवनाचे स्त्री व पुरूष दोन्ही घटक महत्वाचे आहे. या दोघांनी समप्रमाणात आपले जीवन व्यतीत केले तर कोणत्याही अनिष्ठ कृत्य घडवून येणार नाही. परंतु इथल्या भेदभावाच्या विचारसरणीमुळे महिलांना समानतेची वागणूक न दिल्याने त्यांना वेगवेगळ्या अत्याचाराला बळी पडावे लागते. तर महिलांच्या इतर अत्याचारांपेक्षा खुप भयावह अत्याचार म्हणजेच शारिरीक अत्याचार होय. तर शारिरीक अत्याचार हे बाहेरील लोकांकडुनच होतात असे नाही तर जवळील, ओळखीचे, सहकारी, शेजारी, नातेवाईक आणि महिला व मुली ज्यांच्यावर अतिशय विश्वास ठेवतात असे लोक सुध्दा बलात्कार करतात. शारिरीक अत्याचारामध्ये अल्पवयीन मुलांपासूप ते साठ–सत्तर वर्षच्या म्हातारे अशा वयोगटातील पुरूषी व विकृत मानसिकतेचे लोक असतात. यांचे प्रमाण किती आहे हे खालील टेबल वरून पाहू.

**भारतात ओळखीच्या व जवळील लोकांकडून होणारे लैंगिक अत्याचाराचे प्रमाण**

तक्ता क्र ३.

| अ.क्र | संबंधीत असलेले | लैंगिक अत्याचार झालेल्या महिलांची (संख्या ) | लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या महिलांची (टक्केवारी) |
|---|---|---|---|
| १ | वडिल, आजोबा आणि भाऊ | ४८८ | १.४७ |
| २ | ओळख असलेले | ११५०६ | ३४.७६ |
| ३ | लग्नासाठी वचन दिलेले | ७६५५ | २३.१२ |
| ४ | इतर कौटूंबिक स्नेही | ८९१ | २.६९ |
| ५ | जवळचे नातेवाईक | १७८८ | ५.४० |
| ६ | शेजारी | ९५०८ | २८.७२ |
| ७ | सहमतीने राहणारे | ७०५ | २.१३ |
| ८ | सहर्कचारी | ५५७ | १.६८ |

Source: NCRB

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, देशात ओळख असलेल्याच व्यक्तीने लैंगिक अत्याचार केलेला आहे त्याचे प्रमाण ३४.७६ टक्के एवढे असुन शेजारी असलेल्या २८.७२ टक्कट लोकांनी लैंगिक अत्याचार केलेला आहे. तर लग्नासाठी वचन दिवूनलैंगिक अत्याचार केलेल्याचे प्रमाण २३.७६ टक्के इतके आहे. महिला व मुली ज्यांच्यावर विश्वास ठेवतात असे जवळचे नातेवाईक व आजोबा, वडील भाऊ यांनी लैंगिक अत्याचार अनुक्रमे ५.४० टक्के, १.४७ टक्के एवढयाप्रमाणात अत्याचार केलेला आहे. तर सहमतीने सोबत राहणाऱ्या पुरूषांनी २.१३ टक्के लैंगिक अत्याचार केलेला असून ज्या ठिकाणी महिला काम करतात तेथील सहकर्मचारी यांची १.६८ टक्के महिलांवर लैंगिक अत्याचार केला आहे. म्हणजेच वरील आकडेवारीवरूण असे दिसून येते की, महिला ज्या लोकांवर विश्वास ठेवतात किंवा ज्यांना जवळचे समजतात त्याच लोकांनी अत्याचार केल्याचे प्रमाण जास्त आहे.

**निष्कर्ष:**

महिलांवर होणारी हिंसा ही मानवी जीवनाशी संबंधीत गंभीर समस्या आहे. गेल्या कालखंडात महिलांवर होणारे अत्याचार त्यांचे मानवी हक्कांचे उल्लंघन हे मोठया प्रमाणात झालेले आहे महिलांवर अत्याचार हा एक संवेदनशील विषय आहे देशात महिलांवर होणारे अत्याचारची सुरूवात नातेवाईक, शेजारी आणी ओळखीच्या व्यक्तींनी केलेली दिसून येते. एकंदरीत वरील सर्वच तक्त्याच्या विश्लेषनावरूण असे दिसते की, महिला व मुली कोठेही सुरक्षित नाहीत. स्त्रियांवरील अत्याचार हा स्त्रियांपुरताच मर्यादित नाही तर समाजाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या अत्याचाराला आळा घालण्यासाठी शासनानने कायदे तर केलेच आहे परंतू यामध्ये सुधारणा करूण अत्याचार करणाऱ्याला कठोरातील कठोर शिक्षा दिली पाहिजे जेणेकरूण इतर महिला हया अत्याचाराला बळी पडणार नाही आणी शासनाने महिलांच्या संदर्भातील वेगवेगळे प्रबोधनात्मक कार्यक्रम राबवून त्याचा प्रचार प्रसार केला पाहिजे या प्रबोधनाच्या माध्यमातून महिलांन विषयी असलेली तिरस्काराची भावना कमी होण्यास मदत होईल.

**संदर्भ:**

1. Neha Arora , (2012), Human Right and Gender violence, RBSA publishers 340, chaurarasta, jaipur.
2. Shashi. A. mishra 2012, discovery publishing house pvt.ltd. anasari road daryaganj new delhi.
3. Yanyi K Djamba, sitawa r . Kimuna, Gender based violence,perspectives form Africa, the middle east and india.
4. WHO Library Cataloguing-in-Publication Data: Global and regional estimates of violence against women: prevalence and health effects of intimate partner violence and non-partner sexual violence.
5. GLOBAL STATUS REPORT ON VIOLENCEPREVENTION 2014
6. National crime records bureau ministry of home affairs.
7. संपादक, स्नेहलता वामन निंबाळकर, आजचे लोकशाही मुल्यांना वाहीलेले प्रबोधन, प्रबोधन प्रकाशन नागपुर, २०१४.
8. संपादक, चन्द्रेश्वर यादव,रपी कुमार गोंड. हिन्दी साहीत्य के आइने मे स्त्री विमर्श, उत्कर्ष प्रकाशन.

❑❑❑